**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
Chhatrapati Sambhajinagar– 431 004, Maharashtra (India)
NAAC Accredited "A"

Office Tele. (0240) 2403399, 2403400
Registrar : (Off.) 2403333,
(Resi.) 2400203, 2403310
Fax : (0240) 2403113, 2403335
Telegram :- BAMUSITY
Web Site: bamuniversty.ac.in
E-mail: vc@bamu. net
E-mail: registrar@bamu. net

UNIVERSITY CAMPUS
Chhatrapati
Sambhajinagar– 431 004,
Maharashtra (India)

Ref No. ACCTTS/Cash/2023/ 1416-1506 Date 08/11/2023

## परिपत्रक क्रं. / वित्त व लेखा विभाग

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व विद्यापीठ उपपरिसर, धाराशीव येथील सर्व शैक्षणिक, प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महविद्यालयांचे प्राचार्य, परिसंस्थांचे परिचालक, शिक्षक व विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना विविध दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी विद्यापीठ परिसरातील प्रकाशने विभागातून विविध फॉर्म्स (अर्ज) विकत घेऊन योग्यते शुल्क विद्यापीठ परिसरातील कॅश काऊंटर्सवर अदा करावे लागते. यासाठी विद्यार्थ्यांना बाहेर गावावरून विद्यापीठ परिसरात यावे लागते त्यासाठी लागणारा वेळ, प्रवासखर्च इत्यादि बाबींसह विद्यार्थी हिताचा विचार करता स्वीकारण्यात येणारे सर्वप्रकारचे शुल्क व विविध फॉर्म्स (अर्ज) ऑनलाइन कॅशलेस पद्धतीने स्वीकारण्यात यावे असे मा. कुलगुरू महोदयांनी निर्देशित केले आहे.

त्यानुषंगाने सर्व संबधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील कॅश काऊंटर्सवर द्वारे रोख अथवा ऑनलाइन पद्धतीने क्यू आर कोड (QR Code) द्वारे स्वीकारण्यात येणारे शुल्क व विद्यापीठ प्रकाशन विभागातून विद्यापीठाचे विविध प्रकाशने /फॉर्म यांची विक्री होणारी विक्री, याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सोई व विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना विविध दस्तऐवज सहजपणे उपलब्ध होण्यासाठी दिनांक 08/11/2023 पासून सर्वप्रकारचे शुल्क व विविध फॉर्म्स (अर्ज) ऑनलाइन कॅशलेस पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत. त्यासाठी खलील प्रमाणे प्रकिया विहित केली आहे.

विद्यार्थांनी विद्यापीठाच्या http://online.bamu.ac.in/student या लिंक द्वारे रजिस्ट्रेशन ( Registration) करून लॉगिन (Login) करावे. ऑनलाइन पद्धतीने विविध पीडीफ(PDF) स्वरुपातील फॉर्म्स ( अर्ज) डाऊनलोडसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. फॉर्म्स/अर्ज डाऊनलोड करून याग्यप्रकारे हस्तलिखित किंवा टंकलिखित करून दस्तऐवजासह ( Attached required Documents) व लॉगिन (Login) मध्ये उपलब्ध करून दिलेल्या लिंक द्वारे ऑनलाइन पद्धतीने या शुल्काचा भरणा करावा व पावती प्राप्त करावी . तदनंतर फॉर्म्स ( अर्ज) शुल्काच्या पावती व योग्य त्यादस्तऐवजासह

(with required Documents) परीक्षा व मूल्यमापण मंडळातीत तथा संबधित विभागात जमा करावे , व पुढील दस्तऐवज प्राप्त करून घेण्याची प्रकिया करावी.

करिता या परिपत्रकाची सर्व संबधितांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

विद्यापीठ प्रांगण )(

छत्रपती संभाजीनगर 431004 )(

दिनांक: 07/11/2023 )(

प्र वित्त व लेखा अधिकारी

प्रत:

मा. कुलगुरू महोदयांचे स्वीयसहायक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना महितीस्तव सादर

मा. प्र- कुलगुरू महोदयांचे स्वीयसहायक, , डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना महितीस्तव सादर

मा. कुलसचिव महोदयांचे स्वीयसहायक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना महितीस्तव सादर

संचालक, परीक्षा व मूल्यमापण मंडळ, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येऊन विनती करण्यात येते की आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व कक्ष व एम के सी एल यांना पुढील योग्य त्या कार्यवाही निर्देश द्यावेत

संचालक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरीसार, धाराशीव यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

संचालक, युनिक, यांना देण्यात येऊन विनंती करण्यात येते की सदरील परिपत्रक हे विद्यापठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे व परीक्षा विभाग व लेखा विभाग यांचे समन्वयाने सदरील ऑनलाइन स्वीकृती बाबत योग्य तो कार्यवाही करावी.

सर्व प्राचार्य/ प्राचार्या / परिसंस्थांचे परिचालक, संलग्नीत महाविद्यालये, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, आपल्या महविद्यायतील सर्व विद्यार्थ्यांना हे परिपत्रक निरदर्शनास आणावे.

जनसंपर्क अधिकारी , डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येऊन कळविणायत येते की या परिपत्रकाची वर्तमानपत्रात प्रसिद्धी द्यावी.